म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. 2340

REFBK-0022467
REFBK-0022467

काव्य
२२७६८
२०।११।५८
सं।मे
२३६०
भेट

## जीवनोद्दिष्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 2360
22७६८
ग्रंथ, क्रमांक (स्थळ प्रत)

जनमनाच्या आवारात जरी
अपेक्षिसी तू पीक यशाचें
पेरुनि अभिनव विचार दाणे
कृतिने खपसी मेहनतीने

सुखासीन हे प्रेमळ जीवा
वांच्छिसी जरी अनुरुप भावा
अनपेक्षित तुज बेढिल वणवा
जाण सुलाखिल तव व्यक्तित्वा

त्याग सत्य अन् दया प्रेम ते
स्वार्थ परार्थी जनि वितरो हे
तत्व म्हणुनि नच दिसो न द्यावे
परि सुविचारी नित्य असावे

REFBK-0022467
REFBK-0022467

व्यर्थ तुझे ते तरल गोड मधु-
वाक्पाटव जें दर्शित व्यंजन
कृतिशुन्य परि रिक्त हस्त अन्
परोपकारीं कच खाइ मन

मनुज खरा पशु बुद्धी विकसित
उच्च विचारें होई दैवत
इहपरत्रीं लौकिक साधित
आचरून सुकर्मी परहित

## सां गा ती

" मुला, सांगतो तुला, अडखळुनि पडसी
दे हात हातामधिं साथ जरी चालसी
लागल्या ठेंच ना पडसी, सांवरुन धरीन
घालुनी उडी, जिवाची घडी, अंथरुण करीन"

"कांही नको, दादा रे नको, घेऊं दे छंद
कनवाळु असुन तू करीसी मजला मंद
एरवी दुःख सोसुनी घेउ दे उसळी
पखरण जिवाची जुळेल ठरल्यावेळी
पाही रे दूर राहुनी तुझ्याहुन सरसी
घेऊनि एकटी चाल, जगामधिं बघसी
मिळवुनी, जीण हरवुनी सुखा जोडीन
भारुनी, मनें जुळवुनी, ताठ परि मान"

## अमोल निर्मिते

सुंदर कविता रसिका भुलवी
हेलावत हृदय भाव प्रभावी
मनोज्ञ कल्पना मानस झुलवी
परि राहि निरागस मात्र कवी

चित्रांतिल सौंदर्य समीक्षण
वाखाणत बहुवार मुखांतुन
मूक कुंचला उधळित आशय
चित्रकार धनि फक्त " महाशय "

रम्य पहाडीं शिल्प ओतलें
संस्कृतिच्या काळांत झोपलें
दर्दी मोल करूनि गेले
कारागिर किती कंदरी खपले

कारागिर कवि चित्रकार
सृजनाचे हे कलाकार
युगायुगोंचे साक्षिदार
देत अमूर्ता अविष्कार

## स्फुट अभंग ( १ )

मनुष्याच्या जन्मा प्राणिमात्र आले
प्रकार पाहिले जगामाजी

एका हिंद देशा उच्चनीच भेद
नाही खंत खेद कोण्या एका

अज्ञान तिमिरीं असलेल्या जाती
नाही ज्यां उसंती पोटावीण

पोटासाठी अन्न नाही प्रावरण
युगींचेच दीन आजवरी

नाहीं फुरसत त्यांना पहावया
हातीं धरावया पडलेल्या

मला काय त्याचे असुनी प्रत्येकाचें
दीन अनाथाचा वाली नाही

हलाखीचे जिणे मानव नावांने
संपन्न मनाने कैसे पाही

संयमी मनाने चेतवण करा
होऊं दे समरा नवी क्रांती

## स्फुट अभंग ( २ )

कुंभमेळा मी पाहीला
सान थोर ओळखिला
संसाराच्या वाळवंटी
एक सहारा देखिला

सुखदु:खाच्या शेजारी
पहुडलो वाऱ्यावरी
आप्त स्वकीय गोताशी
सोडचिठी मना घेशी

थोरी वागवी मनाशी
लहानासी थोर करिशी
काळ अनुकूल असतां
धन शांतीचें जोडिशी

शेतांतला जणुं ओढा
झुळझुळू वाहे सदा
स्थीर रुपें देई जला
फुलवी आशेचा हा मळा

## स्फूट अभंग ( ३ )

स्नेहाची ओल पुरे
आतुडल्या मनालागीं
कांहीं नको मायाजाल
दु:ख पहातां नुरेल

जनी मनी दोन तोंडें
वरी लाघवी बोलणे
साज श्रृंगार मायेचा
नाच आहे सोंगाडयाचा

कन्या पुत्र गोतावळा
दावि मायेचा जिव्हाळा
मित्र सुन्हद उपकारी
स्तुति सुमने उधळी

एक मायेचाच कढ
नाही त्याला अन्य तोड
आंचे अंतरंगी दाहे
येर दुसरा व्यामोह

## आ कां क्षा

भरताच्या या भूमींत
अशोकाच्या या राज्यांत
स्वराज्य सुराज्य करुन
भारत सुपुत्री संपन्न

परंपरा शासकांची
घडविली इंग्रजांनी
मिळे संदिग्ध बैठक
अजुनि वाटे ठाकठीक

सांचा समाजाचा ढीला
घडवीला कोण्या काळा
संस्कृतिचा हा देव्हारा
देवाविण रिता खरा

नवयुवक नवी पिढी
शासनबंधनाला तोडी
गुरु समाज शास्त्रज्ञ
नको बहुमतें वेंचून

ध्याया वळण शासना
आणि समाज जीवना
देवा धर्माचा विचार
हवा बदल अनिवार

आज आवश्यक झालें
काय नको आणि केलें
शिक्षा शासन जीवन
राष्ट्र धर्म-भक्ति-प्रेम

युवा शक्ति देई मान
कष्ट त्याग व चिंतन
निष्टा कर्तव्य सुशिस्त
राष्ट्रपुत्र हो प्रेरीत

आजि सुयोग्य काळाला
सुकाणु मिळीव हाताला
राज्य करण्या चालविण्या
नीती चाणाक्य हे जाणा

## कवीचें हृग्दत

कवन करित शब्द ज्योत पाजळीत जाई
स्फुर्ति मिळे ज्यांत आणि नवविचार पाही
सुप्तशक्तियुक्त असा संदेशा जनिं देई
सज्ञाना अज्ञाना समयुत कवि नेई

अहेतुकीं या कार्या सृजनाचें मोल मिळे
यज्ञ, दान, तपाचरण आचरितां ज्यास तुळे

ऋषिमुनीनी दिधली जी दिव्य ठेव अति विशाल
प्रेरक शक्ति स्त्रोत ज्यांत झरत सदाकाळ
कवि जागवि अल्पमती दे जाणिव जानपदीं
रुष्ट मधुर व्यंजनांही शब्दशरें ताडी कधीं

विस्मरणी सहजरीति मनुजाची स्खलन रीती
नमन पठण अभ्यासें जागवी विवेक शक्ती

विद्वज्जन वाखाणिति रसिक प्रेमी वा ! म्हणती
नाहि परी जनिं विचार आचरिण्या ही खंती
कवि कार्यी रत राही मानपान समदृष्टी
एक आस जगीं विकास बहुजनास सुखवृष्टी

## निसर्गाची बांसरी

मज मोहिलें सुरांनी
पडले अतृप्त कानी
नकळे जे येति कुठुनी
वंशी - वनात रानीं

वसती नसे जनांची
परि वन्य श्वापदांची
मध्यान्य समयीं कोणी
स्वर आळवीत विजनीं

सहजीं विकल्प आला
गंधर्व यक्ष आला
रिझवी प्रशांत समयीं
भूलोकी विचरण्याला

आकाश सदन झालें
भूतल अथांग सजलें
रश्मी सहस्त्र किरणें
कुरवाळी जगत सगळें

वायु सुसाट उफळे
दावी निसर्ग चाळे
वंशी वनात शिरुनी
आलाप मधुर खेळे

मांगल्य भरुन आहे
लय मांडणी सुरांत
जाणिव करुन घेण्या
तुं होइ सावचित्त

हृहयांतल्या ध्वनींना
ऐकून तुष्ट होई
जरि जाणिलें विचारें
शब्दांत जाण घेई

## वाढदिवशी

मोगरिच्या सान फुला
गंध मंद मुकुलित हो
बाल्य रम्य आमोद भरें
आसमंत पुलकित हो
शैलजा सुहास्य निलयीं
वंशवेल मंजिरी हो
तोषवि मन निर्झरसा
सगुण खनी ईप्सित हो

## वी त रा गी

सहन करिन जन वाद प्रवादित
सोडुनि सकल अभिमान
देह बुद्धी निज परिमित राखुनि
ध्याइन मुनिजन-विश्राम
कर्म फलाशा विरहित बांधिन
चित्तवृति योगानें
ज्ञान-भक्तिची कास धरुनियां
साधिन ईप्सित वाचेनें

## वाढदिवसाची आठवण

रूप निरूपम कांति निरामय
वाणी सुखद श्रावण जलधारा
हेतुरहीत निरागस लोचन
कुलअंकुर सुकुमारा

अंग ढंग तनुचे बहलावी
हरण बाळ जणु क्रीडत न्यारा
कुलतरु अंकुर बाळ मनोहर
आशानिधी मम प्यारा

आजि पातले सगे सोयरे
नव दिन उत्सव करण्या
तुष्टी, तृप्ती, दीप्ती उज्वला
नामाभिद तुज देण्या

आशिर्वच अन् सातत्याला
प्रार्थि ईशाला देई बाला
उदंड आयु सुखशांतिला
गुण सुगंध उजळीं यशाला

आशापाशीं मन गुंतविणें
मागितल्याविण ईशें देणें
अदृष्टाचें उघडें होणें
हेंच कर्म बंधनीं अडकणें

## निर्वासित

दीनवाणा एकला मज भेटला कुणि पांथिक
पाहुनि जिव कालवे कुशल पुसिलें कौतुक
भाव सग्दद बोलण्यानें उमगला निर्वासित
वाट पाही साधण्याला बनुनियां संभावित
काळ गेला आढळे स्थिर तोच पांथिक सुस्थिती
कुतुहलें तुज काय घडलें व्हावया लक्ष्मीपती
"घटणा घडे नच आकळे घटित विधिचें परि फळे
सान आम्ही शुभ्रवर्णी कृष्ण धंदा शुभ चले"
काल गेला काळसा आजि 'आज' वैभव भोगतों
तत्सुखें किमपी उणें नच दानधर्मी शोभतो
मी वदे, "मिरवूं नको धन लक्ष्मी चंचल जारिणी
तारिणी परि तीची होइ पेरिल्या जमिनीतुनी
धन जाय बनुनी धान्य, देशीं स्वस्थता शांती उरे
व्यर्थ परि धंदा दुजा जो, देश बुडवी ऋणि ठरे
जीव लोभी जगत लोभी मान्यता नच परिश्रमा
संपदा आपदा होइ वाढुनी बहु अवगुणा"

## अवघडल्या वेळीं

आयुष्याच्या प्रात:काळीं अवघडण्याची कळा
येत मिसें जरि ज्ञानार्जनीचा सुखदु:खद सोहळा
उपभोगुनि तरि मनीं ठसावा लौकिक उपचार
जाण न येई शुभ्र ढगापरी वाऱ्यावरि स्वार

ऐन उमेदीं बनुनि साहसी प्रेमविपिन शिकारी
भ्रांत फिरे कधि तप्त उन्हांतुनि काळोखाच्या दारीं
परी उतरतां सप्तपाउलें बोहोल्या सामोरी
अवघडे बिचारा प्राप्त झालिया सुखशय्या कांटेरी

भ्रमित मनाने क्रमित मार्ग, ना तुटलेली धार
मृगतृष्णे परि जाचत राही नुमगुनियां नीर
आयुष्याचा सौदा करितां काम दाम अतिरिक्त
घेत अवघडुनि सुखा पारखा मान फुकाचा फक्त

पुन्हा अवघडे स्त्रीसुत गोतावळा पडे व्यामोह
निषेध विधिबंधनीं गुंतुनी झोंकुनि देशी देह
एक सुशब्दा आशुनि राहसि "तूं अससि सुजाण"
पखवाजाच्या दोन बाजुनी वाहसी जिवाची आण

दैवें दिधली आयु पुरी जरि, नातु सुना केळविसी
संसाराचा बाडबिस्तरा सकळांसह पेलिसी
धनमानाची संपत्तिची पार्श्वभूमि लाभुनी
अवघडुनि राहसी जणूं पांगळा आत्मकाठी वांचुनी

## श्री देवकी कृष्ण पंचायतन

शांतिदा हरित वसन ल्याली
भूमिका हरित वसन ल्याली
दिव्या भरणें सुवर्ण केतकी,
दयामूर्ती भासली शांतिदा हरित वसन ल्याली.

देवकीकृष्णा घेत कडेवरी
मातृछाया प्रत्यय दाखवी
ध्यानीं आठवा मानस मंदिरीं
बाळकृष्ण शामला.

रवळनाथा रक्षण करिशी
सिद्ध हस्त बाहिल्या होशी
कृपाकांक्षि कुळवंता होई
आर्त सकळ जनांसी

दाढसंकर्षण संन्यस्त परी
सुष्ट दुष्ट ओळखी चातुरी
कर्म फलाची देत वाटणी
धरिल्या अर्हता परी

गोमतीपुत्र कुलाल द्वीपींचे
महाशैल आणि कुशस्थळीचे
पावन झाले कृपाप्रसादें
कीर्ती दिगंतो विराजे

## मोहजाल

तो- वेध तुझा घेउं कसा सहज उदय प्रीती
झालि असे सांगु कसा पाहुनि तव दीप्ती
मोहरला पारिजात सुमनांचा गंध किती
भ्रमर जणूं रुंजि घेत सुफलित करिं प्रीती

कोमलांगी मंद हास्य मंजुळ तव वाणी
नीलनेत्र चारुगात्री स्नेहभाव जाणी.

ती- साज जरी वरवरचा प्रणय दो दिसांचा
दिनराती क्रूर खेळ नियति योजि साचा
म्लान मुखीं वरी हंसुनी अंतरंगी दाही
नच करीन सुखी कुणास वाटत मज बाई

बंधमुक्त राहुनियां जीवन हें वाहियलें
स्त्री जाती कूट प्रश्न सोडविण्या जणुं वरिलें
आस करीं देइ पुरा बंधुभाव आमरण
भाक तुझी देइ मला भगिनीचें हो स्मरण

## अधुरी वाट

निबिड रान पाउलवाट
नागमोडी अधुरी, बिकट
कैसा जाऊं सख्याच्या गांवा
दावि कोण तयाचा ठावा

काम - धाम न रुचे स्वगृहीं
दिन रातीं हुरहुर पाही
अजि वाटे जिवन उदास
त्याविणें उणीव जिवास

आठवूनि मूर्ति तयाची
साकारिली याद न्हदींचीं
प्रेमरज्जु शोधित गेलो
अमर्याद विश्वरुप झालो

नाम रुप देहा नुरलो
परिमाणा तेथील भरलो
स्वप्रकाश रंगी भिजलो
नभनील गगनची झालो

जगलो मी रात चंदेरी
स्वप्न रूप जागृति सारी
जाणीव घेत जगताची
जीवनी जगुनि मरण्याची

## युगान्त

सारी कृती स्वप्रिती अंध परी दुज्याला
लाचार भाव जणु दैन्यचि धर्म झाला
व्यापार तत्वीं जगणें मरणेंही त्यांत
बुद्धीसदोदित चले अडवुं कशांत

वाणी जनांत नुमटे अति खोल धीट
चित्कार विव्हळ नये अति आर्त नीट
सोशीत शीतळपणें परदुःख पाहीं
झाला असे अजि दिनक्रम शांतिदाई

केलेत त्याग म्हणुनी अजि भोग मागे
दाता दयार्णव तसा परी याचताहे
शीला सुरक्षित म्हणूं तरि काय मोल
मुल्यें सनातन खरी गमलीं अ-मोल

झुंजार वीर रणमंडळ गाजवील
नाही कुणी नर अचेतन जागवील
राही स्वगेहीं तरिही जणुं देइ मोल
कैसा म्हणुं जरी स्वतंत्र युगांत काल

सौंदर्य वानिती जगीं रुचि दृष्टी भिन्न
संगीत गीत जिवनीं परि हेतु शुन्य
साहित्यस्रोत बदले नवरुप काल
अंधापरी स्वरुप घे हरवूनि मोल

## अधुरी वाट

निबिड रान पाउलवाट
नागमोडी अधुरी, बिकट
कैसा जाऊं सख्याच्या गांवा
दावि कोण तयाचा ठावा

काम - धाम न रुचे स्वगृहीं
दिन रातों हुरहुर पाही
अजि वाटे जिवन उदास
त्याविणें उणीव जिवास

आठवूनि मूर्ति तयाची
साकारिली याद ऱ्हदींचीं
प्रेमरज्जु शोधित गेलो
अमर्याद विश्वरुप झालो

नाम रुप देहा नुरलो
परिमाणा तेथील भरलो
स्वप्रकाश रंगी भिजलो
नभनील गगनची झालो

जगलो मी रात चंदेरी
स्वप्न रूप जागृति सारी
जाणीव घेत जगताची
जीवनी जगुनि मरण्याची

## युगान्त

सारी कृती स्वप्रिती अंध परी दुज्याला
लाचार भाव जणु दैन्यचि धर्म झाला
व्यापार तत्वीं जगणें मरणेंही त्यांत
बुद्धीसदोदित चले अडवुं कशांत

वाणी जनांत नुमटे अति खोल धीट
चित्कार विव्हळ नये अति आर्त नीट
सोशीत शीतळपणें परदुःख पाहीं
झाला असे अजि दिनक्रम शांतिदाई

केलेत त्याग म्हणुनी अजि भोग मागे
दाता दयार्णव तसा परी याचताहे
शीला सुरक्षित म्हणूं तरि काय मोल
मुल्यें सनातन खरी गमलीं अ-मोल

झुंजार वीर रणमंडळ गाजवील
नाही कुणी नर अचेतन जागवील
राही स्वगेहीं तरिही जणुं देइ मोल
कैसा म्हणुं जरी स्वतंत्र युगांत काल

सौंदर्य वानिती जगीं रुचि दृष्टी भिन्न
संगीत गीत जिवनीं परि हेतु शुन्य
साहित्यस्रोत बदले नवरुप काल
अंधापरी स्वरुप घे हरवूनि मोल

## मानवाची वाटचाल

देवें सृष्टी उभारिली जणु गारुडी स्वयें झाला
रचुनी एकुण वस्तू ज्यांत नसे उणी स्वयं प्रकाशाला
मनुजा तव कार्याचें मोल असे सिमीत तुलनेनें
वागविसी कां प्रौढी घेउनि अणु रेणु ज्ञान विज्ञानें
आकृतिसी कृति नाही परिमित आहे तदीय आकांक्षा
दानवची वाटे मज उक्ती कृतिला न मेळ दुर्भिक्षा
परिणामी विष आहे परि घ्याया अजि रुचिर गोमटें वाटे
नाशुनि सुविचार विहित कर्म कराया तुला दुखद वाटे
संशोधिसी कां तत्वें जो नच उपयोजिणें सृजन कार्या
नाहि तरी तूं शकसी ओळखिण्या जग हेतु मान्य नरवर्या

## आमच्या शुभेच्छा

प्रेषितो सर्व जगताला
सुविचारयुत भावना
शांति आरोग्य संपत्ति
प्रेम सुख भ्रातृभावना

प्राणिमात्र मित्र सौहार्द
सकल मानव विश्वस्थित
निर्धन धनवान होवो
रोगपीडित रोगमुक्त

निर्दय दयाळू व्हावा
व्हावा कंजूष दातार
अपवित्र दुराचारी
व्हावा निर्मळ ब्रम्हविद्

दूर्जन सज्जन व्हावा
शांति भक्तजनां मिळो
आत्मज्ञानी भवमुक्त
होइजे इतरासवे

ज्ञान, धन, शक्ती सौख्य
सदुपयोग सदा घडो
भूतमात्र जीव देही
ईशस्थित सदा दिसो

प्रकाश मिरवो उन्नत
परमात्माच केवळ
सौंदर्यगुण जेथुनी
प्रगटो विश्वसागरी

## असहाय त्रास

तुज ओळखीं थांबुनि वाट किती चालशी
दम छाक जरी मन तयार फिरण्या अशी
जरि बाहिशी घेण्या मदतरुप आसरा
आंवढा दुखाचा घेऊन दुर्दिन करी साजरा
घे कर्मभोग टाकीत उसासा सजणी पुरा
साथ मिळाया आस धरू नको न्याय जगाचा खरा
प्रभु जीवन देई जगुनि जगण्या जिवां
त्या मागिल हेतु जाणुनि घेण्या हवा
शान जगाची वाढिल ऐसे कर्म आचरी सदा
मार्गदर्शनीं चारित्र्याला लाभो उजाळा तदा
लीन शालिना आत्मगौरवीं प्रौढी मानी तरी
तपाचरण हें सदा काळचे सुत्रबद्ध जणु करी
शक्य ना परी द्वंद्व मनींचे भोगत्रय साजिरा
भोगिल्या विना जीवन यात्रा श्रेय मार्ग दुस्तरा
सगे सोयरे भागि सुखाचे, मनीं निश्चया करी
ठेविती वाटी भरल्या ताटीं, ओंठी साखर खरी
छिद्रान्वेषी इतरेजनाची अनुभूती वरिवरी
केंद्रित करी तव नव उन्मेषां,वाट मिळवीं गोजिरी

## सांत्वना

पाहिले जरि विश्व सगळे
ना परि तू जाणिलें
जीवनी साध्यें उदेलीं
अल्प परि सिद्धीस गेलीं
प्रेरणा ही मिळत गेली
होऊनी आशा - भुली
ठाव नाही मीलनाचा
तृप्ति तृष्णे या जगींच्या
प्राणकंठी शब्द ओठी
भ्रान्त मन वाचा थिटी
दीर्घ आयु अनुभवाचा
व्यर्थ ( बुद्‌बुद् ) मात्र साचा
थांब आत्म्या निर्विकारी
स्वस्थ राही पळभरी
जाणसी जाणून घेसी
शब्द-ब्रम्ही लीन होशी
मन-सतारी वाजवीसी
सुरस संगित मानसाशी
गात राही मोद भरुनी
आसमंती ध्वनि विरोनी

## सच्चिदानंद आत्मा

जल जात आत्मयाचें
वाहून निर्झरांनी
सिंधु अगाध मिळुनी
निरवीत ऐक्य जिवनीं

आद्यंत जें निधान
विश्वीं खुलें प्रसन्न
प्रगटेल जे समोर
साक्षी जणू अभिन्न

साक्षात् अमोल ठेवा
आत्मा असूनि जीवा
मापू गणुनि तुलना
विधिला तरी जमेना

म्हणशील सत्य गवसे
परि शोधिले मुनींनी
मार्गस्थ आत्मयाच्या
अनुभूति स्वल्प मिळुनी

सत् - चित् - अनंत आत्मा
वितरे असीम जगत
कमलादले सहस्र
श्रद्धा रुपें प्रतीत

## सात्विक संसार

संत साधु भुकेला येई
जरि भिक्षा इच्छी कांही
न शिवे तो कुच्छीत अन्ना
आत्म्याला जपतो प्राणा
कुलशीलां भांडण होई
द्वेषाग्नी भडकत जाई
नच वदती अवाच्य बोलां
वरि हंसती अधुरे गालां
प्रणयवीर सात्विक युगुलां
असफल प्रेम जरी विफला
संयमित जीवन चाले
मत्सर देह-त्याग नच वरिले
दिलदार उदार संबंधी
कृपणासी होई संधी
जरि येइल दमडी धक्का
तरी त्यागिल प्रेमळ अक्का
नच कृपणा माया ममता
स्नेही आप्त वा दुहिता
धनरक्षण प्राण पणाने
दिन एकचि सोडुन जाणे

## प्रेमाची परिणती

भावयुक्त भजन तुझे मोद मना देई
अंतरिचें संवेदन मधुर गीत गाई
नाम रूप घेउनि जरि मी तुजला बाही
अर्थ मात्र नकळे मज तृप्ती मना होई
आठवुनि नकळे मज तार जुळविण्याला
नादब्रम्ह सारंगी येत विवशतेला
वाटे मज अपुरे श्रम रुद्धकंठी करी रूदन
गुज मनिचें सांगण्याही हेलावे अंतर्मन
दान काय पूर्वजन्मी हेतुशुन्य मी दिधलें
नाही परी शुद्ध बीज पेरण्यास अजि उरलें
कांहीं नको कांहीं नको देहाची या आरती
सांग सख्या घेशील का आस या मनींची
लिहिले जे विधि भाळीं नटलें या विश्वात्मकीं
दीव्य शक्ती सत्वरूपीं जरि नटली गुणरूपीं

## प्रबोधन

अवलोकुनि जरि बघशी भारता गती तुझी दयनीय
करुनि घेतली पहा जरासी थांबुनि थोडा वेळ

ऋषीमुनीचा वारस म्हणविसी लज्जास्पद कां चाळे
घृणायुक्त देखतो तुला अजि पूर्वज स्वर्गांतले

हीन बुद्धीने स्वार्थी जाहला नाही उपमा तुला
महाभाग उदार चरित हीं व्यर्थची बिरुदें तुला

कीं जाशी नकळत घसरुनि पहिल्या स्थितिला
ज्या आदिमानवा विधिने केला. मनुज अवस्थेला

आदर्श भारतीं करुनि ठेविले उदात्त इतिहासाचे
दूर दूर अजि जाशी मानवा भान न उरत कशाचे

कालचक्र जरी प्रतिकुल असले साधन अनुकुल नाही
नाही अपेक्षित तुझ्यापासुनी कुकर्म स्वार्था पायी

संस्कारांविण संस्कृति टिकणे असे किती कठीण
राष्ट्रधारणा शाश्वत मुल्यें मनी करी जतन

वीर धुरंधर कामा येती स्थिर मुल्यां अव्हेरितां
शासनी मान्यता घेण्यास्तव अजि होई विद्युल्लता

जनवन्ही जंव होई प्रज्वलित चेतवुनि स्कुल्लींग
नाशिल मुल्यें लया नेउनी करील संस्कृति भंग

सौदा नच करी तव बुद्धीचा आदेश आंतला घेसी
टाकी पदाला धीर गंभिरा ज्ञानवान जरि असरी

## चित्रिणी

प्रात:समयी चंचल वारा
दवबिंदुच्या झरती धारा
बालरवी उदयाचलीं आला
आनंदे भरि सकल सृष्टीला

शिशिर ऋतुच्या रम्य प्रभाती
विदुषी एक निघे हरि मंदिरी
सजुनी नटुनी सुहास्य वदनी
पदन्यास लयीं सौंदर्य खनी

वळली सहजी नजर गोजिरी
हेरित होती दृष्टी गहिरी
तसबीर दिसे अपुली सुंदर
प्राणविना जणु गमे कलेवर

चित्रकार पाहि समोरुनी
मिळे हरवले जें त्यास तत्क्षणीं
अलगद ओढी हळू कुंचला
जिवणी खुलली सश्यशामला

पडतां दृष्टी कला चित्रींची
झाली रुसती कडक लक्ष्मीशी
पुसे " काय मम संमती विना
मच्चित्र रेखिशी कसे दूर्जनां "

" घटण्या धडण्या तू जरि कारण
कालच घडवि अपुरे जीवन
कलावान पाईक संधिचा
व्यर्थचि सुभगे रुसवा तुमचा "

## विपत्तीची वेदना

स्वकृत पापें पुण्यें घडवि मनुजा स्थान जगती
मिळे जीं प्राप्तव्यें रजतम गुणी भोग्य असती
मनी आणी मित्रा तव गुण कळे मात्र वचनी
असों द्यावे मेळा अकृत्रिम तुझी स्थीर करणी

अंहकारें प्राणी किती बरळती दंभ करिती
जिथें विश्वाधारा अमित तव कर्तृत्व जगतीं
नसे आदिअंता उकल करण्या विश्वरचना
अगम्या, सर्वांतें सतत मति दे हेतु कळण्या

विपत्काळी ज्यानी स्वजन गणिला दीन दुबळा
अहंकारें मंदें जणु दवडिली संधि सबळा
सुख-दुःख न्याय स्थिती पलटवी रूप उजळे
नसे काला कोणी परजित करी सत्यचि कळें

सुखाच्या आहारीं तगमग करी वेदन जिवा
मिळेनाही जगतिं प्रिय आणि निःश्रेयस कदा
भरे सृष्टी विश्वात्मक रुपिं चित्-शक्ती जननी
जनीं दैन्य दुःखा सिमीत करी प्राप्तव्य करणी

निदिध्यासीं जोडीं प्रियतर जनीं प्रेमसफला
विपत्ती संसारीं सुखकर गमे संचित फला
जई इच्छाशक्ति सबल मित राही निजगुणें
तई मागें देवा जगविं उरण्या वेदन गुणें

## चंद्रनाथ यात्रा ( वृत्त दिंडी )

चैत्र मासींच्या चंद्र पौर्णिमेला
चंद्रगिरिला धरिं हेत भेटण्याला
शैलशृंगी बैसुनि मुक्त देहीं
त्यजिन वृत्तीतें लौकिका विदेहीं

भक्ति भावानें भारुनी मनानें
सृष्टीसतीचें मी होय अंकी लेणें
दीर्घ अनुपम परिक्रमा ती गिरीची
करिन सोपी मानसीं होय साची

शंभु हरहर ये महादेव वाणी
सतत जपतां ये चंद्रनाम ध्यानीं
मनीं स्तविला जो स्थीर चंद्रमौली
देई भक्तां निजकृपा सर्वकाळीं

चढण सोपी तशी सहज साध्य माना
परी निग्रह तो भक्ति भाव जाणा
युक्ति न लगे दुजि दीर्घ जरि प्रवास
बहु आनंदे भोगणें निवास

रश्मि किरणें मृदुशीत वृक्ष छाया
नको परिहारा अन्य श्रम उपाया
आम्र कदली किति कल्पवृक्ष राजी
वृक्ष वल्लींच्या हरित रम्य शजीं

नीर्झरांचे जल विपुल गमे गंगा
जणूं घेई धूर्जटी शिरीं शुभांगा
शिखर गिरीच्या भेटतां श्रीस्थळाला
जेथ वसती करी सेवका जनाला

अति आतिथ्यशील ब्रम्हवृंद
शांत संयमी तत्पर आणि सुशील
क्षुधाअन्नें तृषिता तसें तोये
पांथ रसिका वाटतें मन निवालें

श्रमा विसरुनि जइं पांथ वाट चाले
पडे विसरहि संसार विषय चाळे
एक ध्यान कधीं शेखरा नमीन
मुक्त वारा स्वर्गीय सुख लुटेन

नाम जपिलें भाविलें प्रभू कृपेतें
अष्टभावीं लोटलें शरीरातें
दिल्या ठावा वाटतें करिन वास
परी चित्तीं आठवी गृह मनास

दृष्टींकक्षीं ज्या येई विश्वभागा
न्हदीं भरला कोंदला देहगाभा
नुरे शद्बांचा वाणिचा फुलोरा
येई मनुजा जागृती निराकारा

## दलितोद्धार

दीन दलित दैन्य पंकी
रुसलेल्या अज्ञ जाती
नाही वाली कुणि तयांस
दुर्लक्षित पथ्थर असती

असुनी सम न्याय क्षेत्रीं
वंचित परि मानव कुळी
स्थान योग्य जें निजोचें
जन्मसिद्ध असुनि मुळीं

स्थिति स्थापन कालगती
जीवनार्थ कलह प्रीती
साधिसी जरी समन्वया
घडविण्यासी नवजाती

गुण कर्मी स्वपद स्थीर
देई साज गुणरुपिंचा
विद्याजल शिंपुन मग
फुलवि जनमन बगिचा

देहमुक्ती स्वर्ग प्राप्ती
इप्सीत मनिं ना आणी
नाही दुजी श्रेष्ट अधिक
जनसेवा सकल गुणी

## सहकाराची आरती

जयदेव जयदेव जय श्री सहकारा
गरिब श्रीमंतां तू आशेचा तारा

धन्य तव महिमा पुरातनी मान्य
आजही परि आवश्यक न चले तुजवीण

विविधक्षेत्रीं रिघाव न दिसे रीता ठाव
प्रसंग येतां करिसी रंकाचा राव

दुःखाश्रु नक्राश्रु दलितां धनिकांचे
एका वस्त्रें पुससी राखुनि तत्वातें

लहान थोर उद्यम तुझिया प्रसादें
सर्वहि सिद्धीस जाती पावति सुस्थितीतें

उद्धरण्या या भारतीं न दिसे उपाव
तारक मंत्र जपावा सहकार देव

## भाऊबीज

भगिनी तव पाठची आठवी
शुभदिनी भाऊबीजेच्या
क्षेम कुशल तव आज इच्छितें
सुविहित समयाला

अष्टभावीं मन आतुरलें मम
स्नेहा येत उधाण
साश्रु नयन मन अधिर बावरे
आक्रंदती हे प्राण

येई बंधो सुहास्यवदनें
ओवाळीन मी तुला
आज बीजेचा चंद्र उगवला
याद येत तव मला

ढाल जिवाची करुनि वागसी
परकी सत्ताकाळी
धैर्य शौर्य सुखविन्मुख जीवन
होत स्मरण या वेळी

नाही आकळत या समयाला
घोर जिवा लागला
दिर्घ काळचें अस्थिर जीवन
लाभो सुस्थिर तुला

मूर्ति जनांच्या हृदयमंदिरी
देवो आसन तुला
पात्र राहसी प्रीतिभाजनी
बहुढंगी दुनियेला

नको दुजी रे भेटवस्तु मज
जन सेवा व्रत घ्यावें
मन:संपुटीं प्रेम जागवित
देशकार्यी रत व्हावें

## मानव आणि यत्न

मनुष्यदेहा घेउन आला प्राणी संसारा
बाल्य शैशवा प्रौढावस्था उतरुनिया चालला

नित्य नव्या कल्पना अनुभवा सारित बाजूला
जागृति निद्रा आणि सुषुप्ति करित विचाराला

विचार येती मनीं आणि त्यां नव्या दमाची जोड
खडक फोडुनी पाणी काढीन आवेशाची होड

प्रयत्न करतो पुरनपि हरतो जाय न ते सिद्धी
करी नियोजन कष्टें अविरत चालवितो बुद्धी

कार्य सिद्धीच्या शुभवेळेला कोणो बघियेलें
बघुनी ज्यानी मुहुर्त शोधिला लोकीं खुळे वदले

चिकाटिनें परि कार्यीरत जे अविरत वावरले
जाण सुजाण अजाण सर्वही पुण्य श्लोक गणले

मोल न जेव्हां तव कार्याचें प्रस्तुत कालांत
आठव न धरी भान ठेउनी मनही विचारांत

हरवा कार्यी तव बीजाला व्हाया अंकुरीत
भूमिपुत्र व्हा खऱ्या मनानें पेरुनि मंतरित

## हक्कांची जाणीव

समर अतुलनिय तुंबळ होवो
वीर मोहरे कामा येवो
त्याग शूरांचा विजया आणिल
देशप्रेम भक्तितें रुजविल

स्वातंत्र्य इष्टीची सांगता करी
यज्ञ वेदिवर बलीदान करी
स्वार्थ उच्चतम आदरुनि परी
झिजुनी जीवनीं मरणा स्विकारी

धन सुत दारा देश कार्यी रत
पाहाण्या भारत सुस्थित उन्नत
ऊर्मी मनिच्या उठविल लहरी
प्रबोधन घेऊन आळशी घरीं

शापित जीवन जागृति घेइल
नवप्रकाश उदया येईल
स्वातंत्र्याचा अर्थ सुगम जनीं
फक्त रणांगण पटवुन देइल

वैचारिक मत आणिल विजया
नकोत शस्त्रें शासन बदला
विधान आणि लोकसभेला
लोक प्रतिनिधी निवडायाला

मत पेटिंत जो कागद येईल
शुद्ध मनाचा कौलच राहिल
दबाव पैका लांच लबाडी जरी
बंड करी जरी आंतुन पसरी

सुक्षितानो, नवयुवकांनो
आव्हान हेंचि तुम्हां प्राणप्रियांनों
उघड्या डोळीं ठेंचाळील मग
मारिसी कैसे राजकारणी तग

## दुःखद स्मृति

जरि उगवती मानसांत
दुःखद स्मृति विरलेल्या
वाळुनि जरि जीर्ण तणें
बिजरूपें उरलेल्या

हरितवर्णि शैवाली
पुष्करिणी जणुं भरली
वायुसवें जाय दुरी
नितळ जळा वाट खुली

सूर तुझे निनादले
आवर्ती परि फिरले
ऐकवील एक ध्वनी
मोहजाल दूर पळे

विराग ज्योत पाजळुनी
इंधन समदृष्टीचें
वादळ जरी आसमंतीं
अंतरिचा दीप जळे

हरवुं नको परि मनास
आत्मतत्वी निदिध्यास
होशील कारण सुखास
मानव कुळीं स्वप्रकाश

## चिर-प्रतिमा

जरि देखशी मानस मंदिरी
नव मानव चिर-प्रतिमा
जीवन जीचें घडवित असशील
जाणुन नेणुन कवणा

वस्तुनिष्ट जरि प्रयत्न करशिल
शुद्ध प्रेम पसराया
उजळेल मानवा क्लेश रहित सुखी
होशिल सकळा जिवां

या जनसागरी बुडशी वासना
क्लेश करुनियां घेशी
उठि उन्मनी लावि मनाला
बुद्ध कृष्ण सा जगशी

या प्रतिमेच्या आदेशानें
घडत असे तव जीवन
यत्न साध्य करीं जाणिव पूर्वक
शक्य असे प्रभूमीलन

वस्तुनिष्ट जाणोनी करतील
केंद्र रहित प्रेमाला
या संसारी दुःखी नसतील
इप्सीत साध्या सकला

दुःख असे कीं मानण्यावरी
सहन करी मनोधैर्यें
आघात तीव्र ते सुसह्य होतिल
प्राप्त जरी जन कार्यी

सत्य प्रीयता बाणो अंगी
करुणासहित प्रसंगी
जाणिव ठेवीं देशकाल परि-
स्थिती स्थापन वितरणीं

## मनोमीलन

मन मानव सागरीं घेत उडी
ये स्वार्थरहित अनुराग घडी
मानव येई धरुनि मनीं गुज
मनची साधी प्रपंच हेत निज

शांत संयमी संपुटीं दडतें
प्रबल विकारां फुलवी मन तें
मनची कारण महान कृतिला
व्यास वाल्मिकी छंद लागला

मनची कारण देशोद्धारा
तेचि मन वरी परवशतेला
दिसे आळशी हत मरणोन्मुख
सांगत मन ऊठ साधीं मनोरथ

एकाकी मन साधन जुळवित
तेंचि समष्टीं करी प्रवाहीत
विचार लहरी नभीं कोंदती
सर्व एक होण्या आतुरती

मन निर्झर निर्मळ राखावें
मन मीलनीं दुखिया सुखवावें
स्वार्थ परार्थी मध्य साधुनी
जन मन साधनी स्वहित करावें

## श्री दत्त मंदीर

कुशावतितटीं औदुंबरतळी, दत्त मूर्ती शोभली
धालें मन हें देखुनि दत्ता, पुण्याई फळली

कुशबनवासी दत्त प्रेमी जे, आर्त भजन करण्या
त्यांसी पावन करण्या अवचित, दीन दुःख हरण्या

मंदिर सुंदर आकर्षित करी, भक्ति भाव उपजाया
दुष्ट विचारां नाही आसरा, प्रेमशक्ती प्रसराया

मनः शांतिच्या प्रेरक बीजा, जनगण सांभाळो
हेंचि मागणे दरोपरी नव चैतन्यें उजळो

शुचिर्भुतता मानस मंदिरी, दत्त ध्यान सांठवी
आचारांतही बहु सुजनता, प्राकारही शोभवी

अभक्ष भक्षण सुरापान जे, करितील या क्षेत्रीं
अपात्र होतील कृपा प्रसादा, श्रीगुरुची विस्मृती

करतिल जे जन प्रपंचकार्यी शुभचिंतन गुरुचें
सुकाल वितरण निजकर्तव्यीं, काय कुणाचें वेंचे ?

सुग्रामाच्या पूर्णत्वाला, प्रेरक होवो सकल जनाला
जीवन कार्या समृद्धीला, ध्यातां नेई दैन्य लयाला

## विश्व जननींचा इच्छा भंग

तेजोमय तम लोपत येइ युगांतराची घटका
उदया येई नवसुर्याची अर्धोन्मिलीत कलिका

ध्यानमग्न जणु निबिड शांतितुनी उमटे पहिला ध्वनी
सोऽहं शब्दें जागृति येई चराचराच्या मनीं

नारिनटेश्वर रूपें योजी सृजन विश्वकार्याला
जीवसृष्टींतुनी सातत्याचा हेतचि मग प्रगटला

विश्वाची या प्रेरक शक्ती आनंदे बहु घाली
अंतर्यामी हंसली खुलली स्वानंदे नटली

भान नुरे लय नाद ताल पद न्यास विषम जाहला
भीती द्वेषें एक दुज्याची शांति भंगिता झाला

बहु अनुतापें ज्ञानसाधना मार्ग दाखवी जननी
शांती, प्रीती, समानतेच्या तत्वांना वाखाणी

नच विसरणें निसर्ग नियमां पात्र न कोणी क्षमेला
हेत विश्वजननीचा विपरित कैसा मनुजें केला

## जीवन स्रोत

प्रकांड पंडीत पूर्वाश्रमीं जईं
चलित मन:स्थितीं वहात जाई

विश्राम मिळे त्या राजपट्टणीं
जेथ निनादत विशुद्ध वाणी

तपः साधना दीर्घ कालींची
जात गोत कुल याद कुणाची

जीवन साथी परिवाराला
कंठीत दिन कटु प्राप्त स्थितीला

अजि पंडित शोभत मान्य कुळीं
तप कारण साधन सिद्धी मुळीं

वाल्मिकी बनला थोर मुनी
गुरुकृपा अनुग्रह थोर जनी

सुफळ मनोरथ मान अनुग्रह
मिळत अमित तरी ना मागत

साधना अहर्निश एकचि कारण
सुवर्ण सुलाखे तप्त मुशींतुन

नरदेहीं जीवन वागविलें
बुद्धीज्ञान सुरुपीं शोभियलें

चरित जयांचे ध्रुव ताऱ्यासम
जरि पथिका हो मानस विभ्रम

## जीवित मुक्ती

राजकारण करी तत्वानें
नि:स्वार्थयुत स्वच्छ मनानें

न आणीं मनीं तव बुद्धी
श्रम कष्ट विना समृद्धी

करि विवेक मिळल्या सुखसिद्धी
नच होई सुखासिन बुद्धी

आदरी स्वउदीम नीतिनें
अप्रमाण सदा दिनवाणें

ज्ञानवान सुचरित होई
कृति उक्ती मेलन देई

विज्ञान थोरवी जगताला
सुविहिता धरी मानवतेला

उपासना अमुप श्रेष्ट मनाला
त्यागी जीवन आचारण्याला

संयमी साधका जरि झाला
सफळ होशी कर्मफलाला

स्वयंप्रकाश सनातन पाही
स्वात्म चित्त मिलनी नित राही

ज्ञानभारित जीवन जयाचें
देत प्रेरण सदा जगतातें

## जीवित मुक्ती (२)

मधु कण कण मक्षिका वेंचिते
प्रीत फुलांशी करुनी
सुंदरपट कमनीय दुशेला
धागा धागा करुनी

लंकेची पार्वती सुखविते
पर्ण कुटिर निवास
धन, ऋण मद आढ्यता जाळते
राजभोगीं सुखवास

(३)

धन सत्तेला कालें वरिलें
निज कर्तृत्व बलानें
मान मान्यता आणि सुबत्ता
उच्च पढिक ज्ञानानें

घरकुल विशाल वाडा बनलें
आप्त दास जनिं भरलें
नाहि परी सुख-शांती सदनीं
ऐश्वर्य द्रव्यरुप झालें

## शब्द

नाम शब्दांनी उच्चारी
अर्थ चालला सामोरी

करितो आठव वस्तूची
कीर्त अनादी शब्दाची

जरी निराकार वस्तू
स्मरण करितां जाय किंतु

अंध शब्द - आयन्या पाहे
तरी समाधान लाहे

शब्द मापील अनंत
परी त्याचा नाही अंत

ज्ञानार्जनी विधि - निषेध
शब्द कारण मोक्ष बंध

शब्द अविद्या आहारी
आपत्ती ते अगा खरी

सत्य स्वधर्म शब्दाचा
जेंवि स्वभाव नीराचा

शब्दीं करावें दर्शन
ज्ञानाज्ञान प्रदर्शन

## प्र ति ज्ञा

काव्यपंक्ती ऐशा । मांडीन साजिऱ्या
प्रेरक तूं होईं । गुरुवर्या

अर्थवाही शब्द । भांडार तुटपुंजें
प्रास अलंकार । यमकादीक

विचार उच्छीष्ट । घेऊनि मी केली
गोधडी सजविली । माझी म्हणुनी

ना धरीं अहंता । झाल्या अमोलीक
आणिक कवतुका । पार नाही

स्फुरतें माझें मन । गुरुनाथ कृपें
मित्र प्रेमामृतें । थारा देती

विचार मांडीन । सुख बहुतांचें
हीत जीवनांचें । ज्यांत असे

सनातन धर्म । जगता कारण
आचरीतां धन्य । जन होती

प्रमेयें उदात्त । अनादी काळाची
त्रिकाल बंधनी । स्थिर सत्य

दया प्रेम सत्य । त्याग समदृष्टी
वाहे मन चित्तीं । सदाकाळ

ऐशिया जीवनीं ।शांतिधन जोडा
मानसिक ओढा । तत्वज्ञानीं

## अवसान

गुणिजना कुतुकें अभिभाषसी
हरखुनी सुयश-पथ दाविशी

कुलाकुल मनी नच आणितां
अवसान मिळो पथि धैर्य त्यां

नित तयां वद "व्हा चला पुढें"
म्हणु नको बहु न्युन कसें घडे

कलिकाल तयांस्तव बाहतो
तव समर्थ वरदा कर इच्छीतो

जरि दिसे तुजला अणु एकटा
परि समर्थ फुटतां निज गूढता

स्फुरण प्रेरक बोल रणांगणी
जय पराजय तुळे जनगौरवीं

तनमनें युवकां तव साथ दे
उपकृतीं तव राख सदा मुदें

निजकार्यीरती मन देह वा
यशकीर्ति असो परि वानवा

अनुकूल असेल तुझ्या करीं
अनमानु नको करण्या परी

आसक्ति जनीं न धरी कदा
सुखविसी स्वमना जगण्या तदा

## जीवनकला

बद्धासनस्थ कमलीं प्रतिमा प्रशांत
अस्फूट युग्म कलिका जणु स्तब्ध नेत्र
अस्पर्श शांति सलिला दगडांतुनी ये
पूजार्थ देव नभिचे वरि लोटताहे

पुष्पें विसर्जित पदीं जणु धन्य झालीं
मानुष्य दिव्य मतिनें निरगांठी केली
प्रेमार्थ जीवनकला अभिव्यक्त झाली
निर्जीव भाव सगुणीं रस ओतलेली

सौंदर्य सुक्ष्म रतिचें पुरुषीं मिळालें
ऐक्यांत भेद विरुनी उरलें निराळें
तारुण्य मस्त सुशरीरहि भोग घेण्या
वात्सल्य बाल्यहि तसें नरदेह लेण्या

भावार्थ तार चढली सुर केवलांत
सुस्मीत अक्षय खुले प्रभु दर्शनांत
योगी कलाकार गुणी समजोत अर्थ
अश्रद्ध भ्रांत सुजना वदणेंहि व्यर्थ

## दुसरा मनु

प्रसंगी पाण्याशी विलिनपण इच्छी मीठ खडा
नुरे स्वत्वा आणि त्यजित स्वरुपा तो फुलकिडा
मिळे त्या स्वच्छंदें सकल उडण्या भूमि गगनीं
परी त्यागी रूपा प्रथम वरुनी अन्य बनुनी

प्रसंगी संसारीं घरकुल उभें स्थीर कुळीचें
कुबुद्धी आवाही सुत जमविण्या हीन मतिचें
फसे, होई हांसें, नसुनि इकडे वा पलिकडे
जरी स्वत्वा घेई परि परतण्या दुस्तर कडे

निसर्गें रचियेल्या चर अचर वस्तु बहुविधा
मिती त्यांची कैसी करुं न शकतो मानवबुधा
असे जाती लोकीं बहुविध परी एकवटल्या
परी त्या नाशाया हितकर नसे बांध फुटल्या

समाजा धाराया घडत प्रक्रिया काल विरळा
नसे कोणी जाणे कधि भरत ये मात्र घटिका
दिसे आर्यावर्ती अजुनि उपजे कीं मनु दुजा
करी जो स्वास्थ्यातें बहुजनहिता शांति मनुजा

## नसतें नातें

माझ्यांत उगवती स्मृतिचीं प्रेमळ नातीं
फिरफिरुनी नाचती प्रणय भुता भोंवतीं

त्या गाढ रंगिच्या वक्र सुशोभित रेषा
आसावत मन फोल तृषेच्या पाशा

अनुराग प्रीतिचा मादक किति दरवळे
कीं अग्रहूत जणु प्रभात समयीं मिळे

चौफेर उधळला वारु प्रतोदा विना
खंबीर स्वार किति शके आवरुं मना

भावना आणि वासना चेतविली आग
आलाप समेची लयीं हरवुनी जाग

विस्मीत मनानें स्मृति ताणली जेव्हां
तों झणी उमगली वसने बेगडी तेव्हां

मी भोगी मनानें कृत्रिम सुख जिवनांचें
कधि वाहुन जातों नातें ओढुन नसतें

## वेळ आणि काळ

अवेळिंही प्रतिभा फुलते
अंतरंगी जेव्हां
झपाटल्या ऐसा धावे
संकटांत तेव्हां

ग्रीष्मऋतु दाहक वन्ही
वृष्टी मेघ जेव्हां
चमत्कार प्रभुचा व्हावा
दास इच्छी तेव्हां

नाहिं परी वर्षे जाती
होत साधनेला
मृत्युकाल कैसा न चुके
सानुकूल दैवा

दुर्भिक्ष मात्र हाता येई
तृषार्ता न पाणी
आयु पुरी हाका मारी
इष्ट कर्मभोगा

## इतिकर्तव्यता

नवबालक जरि प्रश्न सहजीं विचारी
मन कोरें नीर्मळ घेइ कुतुहला भारी
विश्वास दिलासा पूर्ण राखी वडिलांसी
जें उत्तर येई सहज मानी आपैसी.

शालेय शिक्षणा विद्यालयीं जइं जाई
सुमित्र कुमित्रां अभेद मिश्रित राही
अभ्यास परिक्षा देण्यास्तव सजवावा
गणवेश मिरविण्या कुमारकाल हरवावा.

शालेय परिक्षा पास बहुगुणें झाला
कॉलेज शिक्षणा अनुभवी मुक्त हवेला
तों दिशा उगवली सांगत कमव धनाला
शतपथीं गुंतुनी निराश होत मनाला.

मागुनी मिळत वहिवाट जगाच्या दारीं
परि अत्यावश्यक ठोठविण्या सुविचारीं
निश्चित मिळावें स्थान सहज संसारीं
परिश्रमा फळाला कल्पवृक्षसा दारीं.

दुर्दीन संपती झाल्या अनुकुल गोष्टी
मन स्थीर, स्वास्थ्य ये पूर्वजन्मीचें गांठी
या अपुल्या मरणा भेटण्यासी तुं जगसी
कधि येइल म्हणुनी प्राणसख्या परि झुरसी

## विमुक्तता

अंधाराच्या निगूढ राती
भक्ती वणवा पेटुं लागला
काहिल झाली शरीर वरकड
चिंतचें जड सुख जें अवघड

बाहेर आलों कोणा नकळत
मिळेल म्हणुनी शांती दैवत
रात्रीचा फिरफिरूनी दमलो
दमुनी अंधारांत बुडालों·

कांहि दिसेना ना कुणि सोबत
उजेड अंत:करणीं प्रकाशत
आसमंत प्रकाशीं दुपारत
हळूच नेई अंतर कापत

दिसे एकटा एकाकी रवि
नभः कोंदणीं प्रकाश उधळित
सदन तयाचें जें सर्वांचें
बसलों सन्मुख आज्ञा पाळत.

रात साजिरी बहुजन्मा सार्थक
सुंदर प्राचिप्रभा जणु दीपक
प्रेमी - मीलना जी मज करवित
देउन साक्षात्कारी स्वर्सुख.

दृढालिंगनी मीलन प्रभुचें
मी देई घेई सर्वस्वातें
प्रेम शांतितुनी मिळत समाधी
जीवन्मुक्त विमुक्त उपाधी.

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
ग्रंथ शाखा

आत्मगीत

निःशब्द गीत गात रहा स्वानंदीं शांत रहा
ऱ्हत्संगीत भक्तिगीत आनंदें गात रहा
पूजाविधी आराधन कां करिशी आवाहन
प्रतिबिंबी मीपणास जोपासुन अंतर्मन
संतुष्ट मनीं गाशी जरी विनासुर ध्वनिलहरी
पूर्ण ऱ्हदय ओथंबुनी पर शरिरीं ओज भरी
सत्यप्रेम अविकारी शुन्यमनें क्रांति करी
भक्तियोग महाकठिण समीपता साध्य करी
शक्ति दैवी उपासुनी जाणुनि घे आत्महिता
रिक्त मनीं तृप्तऱ्हदीं गुप्त गूढ उकल करी

## संचित

कुसुम सुगंधित शय्या सजली
निद्रा दूर पळाली
धन बैभव संपदा लाभुनी
पारखि संस्कृति झाली

शल्यकर्मविशारद शोधी
अडका आपत्कालीं
विज्ञान - ग्रंथ - महाल सजविला
बुद्धी भ्रमिष्ट झाली

मिष्टान्न अन्न सुग्रास मिळाल्या
अग्निमांद्य परि आले
धन्वंतरी भेषजां पुरविल्या
जीवन रोगी झालें

ललित नाटच अभिरुचि मिरविल्या
स्वाथ्य मनीचें गेलें
नशीब प्रभावी वर्तन चोखट
संचित अडवें आलें

## दैवी देणी

दिनकर येई करण्या जागृत
जणु आज विरू दे गतकालांत
नीलाकाशीं स्वयं प्रकाशी
तेज वर्षुनी दिक्कालांत

जीवजात येई उजळुनीं
तम अमंगल मंगल होई
संघर्ष घडे सुख दुःखाचा
जीवनस्रोतची आशा होई

वेडा मानव साक्षिभूत परी
कर्ता रचिता स्वतास मानी
जिवन प्रवाहीं नाव आपुली
हाकारित स्थल काला नेणी

अपुल्या हाती यत्न परिश्रम
व्यर्थ फलाशा केविलवाणी
सुफल मनोरथ सार्थ सुभाषित
घडल्या म्हणिजे दैवी देणीं

## लोकवाणी

बेरिज जुळतचि नाही ग बाई हिशेब संपत नाही
आकड्यांत आंकडा मिळवित मी जरी जाई–हिशेब संपत नाही
किति शिकलें मी, वर्गांत पहिली, हुशार चारी चौघीं
ना ठाउकी मला कोणि म्हणितली लेची पेची बाई

कौतुक माझें कुंवार असतां तोंड भरुनियां झालें
पत्निपदी आरुढ होउनी पतिगृह शोभविलें
संसाराची जबाबदारी मेटाकुटिला आणी
मान मिळाला, धनीण झालें वैतागाची खाणी

यदृच्छनें आलीं असली सत्ता अधिकार मुळीं
चमक:बुद्धीची सदा गौरवी हेरुनि सर्वही काळी
सदा भेदिलीं हितशत्रूंचीं मार्मिक सोज्वळ जाळीं
जीं झाली मजपुढें निकामी शस्त्रें कोण्या एका काळीं

नाही आजवरी विचार आला ताळमेळ घेण्या
तोळामासा जिव हा होई दुसरी बाजू नाण्या
संग्रही असली बहु संपत्ती अपुली परकी कळण्या
आवश्यक अजि परी जाहलें पारखुन घेण्या

बुद्धी ना चले, मती कुंठली, वाट पुसट जहाली
स्वैरपणें जरी धीर धरियला उसनी एटचि झाली.
–लोकवाणी य कार्य कुशल तूं विश्रांति आजि घई
दुज्यां वाट दे या कार्याचा विचका होइल बाई

## कवीची खंत

जाई एक दिनीं कवी वरमुनी काव्यौधीं जो डुंबत
इच्छी कोण गुणी मिळेल करण्या दिग्दर्शना सांप्रत
व्यक्ती थोर तशी यश:प्रभ गुणें काव्य प्रसादें स्थित
आणि आवडती नवेदित कवीं ज्यां स्थान ना निश्चित

लाभे दैववशात् प्रतिष्ठित कवी तेजे तपस्वी जसा
काव्याचे लघुबाड पाहुनि स्मितें बोले स्वयें राजसा
'आयु दीर्घ परी तपाचरण दो वर्षें कशी साधना
होई मान्य कशी सभेंत मिळण्या त्वस्थान यई मना'

होवोनी स्वमनी खजील दुसऱ्या गांठी कवी आगळा
तेजें सोज्वळ जो वदे नवकवीं काव्यीं फुलूं द्या मळा
कीर्तीमान्य दिगंती, शासनी तरी ज्या स्थीर उच्चासन
संभावित वदे; 'असूनि बुटका स्वर्गासी दे हात न'

राही शांत कवी रचूनि कवना धेई धडी सारुनी
घेवोनी मुजरा करी सन्हृदयें, वा दंभ चेष्टा मनी
ना कोणीं विनवी, तसाच दबवी वा प्रेम लोभास्तव
शब्दीं मेलन वागविचार सुरुपें, घेई स्वसौख्यास्तव

## क्षुद्र भाव ते काय ?

मंतरलेला ताईत कोणा सुखविल काय ?
दडपण मनींचें अुचलुन घेइल यंत्र मिळेल काय ?
ममत्वाची ओढ जागल्यावीण भेटेल काय ?
ताईत मनाचा यंत्र बनवितां दडपण जाईल काय ?

मैत्रिखातर धनकालाचें भान राहिल काय ?
प्रीत आइची देह झिजवितां बोलुन दाविल काय ?
खडक अढींचे आनंदसागरीं बुडलें नसतिल काय ?
हिमालयासम आत्मतुष्ट जिण, क्षुद्रभाव ते काय ?

बालपणीचा आठव वृद्धावस्था सुखबिल काय ?
दाता उधळुनि देत धनाला, याचक तुषविल काय ?
यम नियमांचा सुख-शांतिशी मेळ होईल काय ?
मर्यादा पुरुषोत्तम पाळीं उन्मत्ताला काय ?

मन यंत्रावरी स्वार होउनि तडिते सम भाससी
श्रेय ध्येय ठरविल्या मनाने विचलित का होशी ?

2360
22796
REFBK-0022467
REFBK-0022467

## बालहट्ट !

घेऊनी कडेशी
लडिवाळ बाळ
पुरवित आळ
अन्नपूर्णा १

सहजीं मिळाली
फुटाण्याची दाळ
असूनीं अवेळ
त्यास देत २

दंतहीन बाळ
स्वाद न कळत
आई तोंडी देत
परतोनी ३

नावडोनी बाळें
घास परतिला
आईने गिळीला
प्रेमामुळें ४

बाळ हट्ट करी
ध्याया पुन्हां रुची
तीच गोड त्यासी
संपलेलो ५

तसलीच दूजी
माऊली आणीत
बाळा हातीं देत
शांतविण्या ६

बाळ हट्ट करी
थोर तेंच करी
नका जाउ दूरी
पहावया ७

संपलेल्या मागें
किमत चढत
असतां हातांत ८
उणें मोल